सकाळ

# वारी हे समानतेचे प्रतीक

## नीलम गोऱ्हे यांचे मत; 'वारी नारीशक्तीची' उपक्रम



**शनिवारवाडा : राज्य महिला आयोगाच्या वतीने 'वारी नारी शक्तीची' या उपक्रमाप्रसंगी डॉ. नीलम गोऱ्हे, मुक्ता टिळक, विजया रहाटकर उपस्थित होत्या.**

**पुणे, ता. २७ :** ''पालखीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्यक्रम होणे गरजेचे आहे. वारी हे प्रबोधनाचे पहिले व्यापक पाऊल आहे. वारीच्या निमित्ताने वारकरी जातपात बाजूला ठेवून एकत्र जमतात. त्यामुळे वारी हे समानतेचे प्रतीक आहे,'' असे मत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

राज्य महिला आयोगातर्फे महिला सक्षमीकरण, सबलीकरण आणि समानतेसाठी 'वारी नारीशक्तीची' हा उपक्रम राबविण्यात आला, त्या वेळी त्या बोलत होत्या. या प्रसंगी महापौर मुक्ता टिळक, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, डॉ. सदानंद मोरे, उषा वाजपेयी, मंजूषा मुळवणे, योगेश गोगावले, राखी रासकर उपस्थित होत्या.

> **'वारी नारीशक्तीची' या उपक्रमात अनेक महिलांविषयी उपक्रमांचा समावेश केला आहे. महिलांचा पालखीतील सहभाग पाहून हे कार्य वारीपासून सुरू करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.**
>
> **- विजया रहाटकर,** अध्यक्षा, राज्य महिला आयोग

या वेळी सक्षमा प्रकल्पाचे उद्‌घाटनही केले. यात राष्ट्रीय आरोग्य संस्था, आम्ही उद्योगिनी प्रतिष्ठान आणि राष्ट्रीय सेवायोजनेचा सहभाग होता. तसेच, पारंपरिक पोशाखात मुलींचा व ढोल-ताशा पथकाचाही यात सहभाग होता.

डॉ. मोरे म्हणाले, ''महिला आयोगाने वारकऱ्यांच्या प्रबोधनाचे काम सुरू केले, हे कौतुकास्पद आहे. या वारीत सर्वांनाच सारखे स्थान आहे. वारीत पूर्वीपासूनच महिला-पुरुष असा दुजाभाव नाही. त्यामुळे महिलांसाठी काम करायचे असेल, तर वारीला जोडले जाणे गरजेचे होते.''

# महिलांसाठी 'वारी नारीशक्तीची'

म. टा. प्रतिनिधी, पुणे



राज्य महिला आयोगातर्फे महिला सक्षमीकरणाची दिंडी काढण्यात आली. या वेळी डॉ. नीलम गोऱ्हे, विजया रहाटकर, मुक्ता टिळक उपस्थित होत्या.

आषाढी वारीमध्ये यंदा 'वारी नारीशक्तीची' या उपक्रमातून महिलांचे सबलीकरण साधले जाणार आहे. सॅनिटरी नॅपकिन आणि त्याची विल्हेवाट लावण्यासाठी मशिन, महिला सक्षमीकरणाचे संदेश देण्यासाठी वारीच्या दोन्ही मार्गांवर फिरता चित्रपट महोत्सव, कीर्तन, पोवाडा आणि भारूड यातून जागृती असे विविध उपक्रम यंदा राबविले जाणार आहेत. गुरुवारी या उपक्रमांना सुरुवात झाली.

राज्य महिला आयोगातर्फे या वर्षीपासून सुरू करण्यात आलेल्या 'वारी नारीशक्तीची' या उपक्रमाचे उद्घाटन शनिवारवाडा येथे गुरुवारी झाले. या वेळी चित्ररथ आणि महिला सक्षमीकरणाची दिंडी काढण्यात आली. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, महापौर मुक्ता टिळक, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे उपस्थित होते.

'महिलांसाठीच्या महत्त्वपूर्ण कायद्याच्या जागृतीसोबत विविध योजनांची माहिती पोहचविण्यासाठी आणि त्यामध्ये महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने वारी नारीशक्ती हा उपक्रम निश्चित महत्त्वपूर्ण ठरेल,' असा विश्वास गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

## वन विभागाचे चित्ररथ

दर वर्षीप्रमाणे यंदाही श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर तसेच श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या योजनांची माहिती देणारे चित्ररथ सहभागी होत आहेत. सामाजिक वनीकरण विभागाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक अनुराग चौधरी यांच्या हस्ते व अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. दिनेशकुमार त्यागी यांच्या उपस्थितीत या उपक्रमाला गुरुवारी सुरुवात झाली. या चित्ररथामधून विविध योजनांची माहिती देण्यात येईल. उपवनसंरक्षक ए. श्रीलक्ष्मी, विभागीय वन अधिकारी दिलीप घोलप, विभागीय वनअधिकारी रामदास पुजारी, संत श्रीपाद बाबा संत रामदास बाबा पालखी सोहळा या दिंडीचे इंगोले महाराज यांच्यासह वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिला आयोग की 'वारी-नारी शक्ति' दिंडी सराहनीय पहल

## महिला सक्षमीकरण हेतु दिंडी के उद्घाटन अवसर पर विधानपरिषद की उपसभापति नीलम गोर्हे ने कहा

**पुणे, 27 जून (आ.प्र.)**

पुणे शहर में जन जागृति की अच्छी परंपरा है. इसे ध्यान मे रखते हुये महिला आयोग ने 'वारी-नारी शक्ति' दिंडी का आयोजन करके अच्छी पहल की है. यह राय विधानपरिषद की नवनिर्वाचित उपसभापति डॉ. नीलम गोर्हे ने व्यक्त की. उन्होंने कहा कि महिला सक्षमीकरण हेतु जन-जगरण करने की जिम्मेदारी सिर्फ महिला आयोग पर नहीं है, बल्कि यह हर नागरिक का काम है और सबको इसे करना चाहिए.

वारी में महिलाओं की उल्लेखनीय संख्या को ध्यान में रखकर महाराष्ट्र राज्य महिला आयोग ने इस वर्ष 'वारी-नारी शक्ति' दिंडी व चित्ररथ का आयोजन किया है. इसका उद्घाटन गुरुवार को नीलम गोर्हे ने किया. इस अवसर पर महापौर मुक्ता तिलक, संत साहित्य के विद्वान डॉ. सदानंद मोरे, महिला आयोग की अध्यक्षा विजया रहाटकर, सदस्य सचिव मंजूषा मोलवणे, वृंदा कीर्तिकर, योगेश गोगावले, राधाबाई सोकासे आदि उपस्थित थे.



**शनिवारवाड़ा में आयोजित कार्यक्रम में महिलाओं की 'वारी- नारी शक्ति दिंडी का उद्घाटन व चित्ररथ का लोकार्पण करने के बाद भिड़ेवाड़ा तक दिंडी निकाली गई. इसमें विभिन्न क्षेत्र की दिग्गज महिलाएं शामिल हुईं.**

### 'वारी-नारी शक्ति' में ये कार्यक्रम होंगे

*वारी-नारीशक्ति दिंडी में दोनों मार्गों पर चित्ररथों में सैनिटरी नैपकिन्स की वेंडींग और उनके डिस्पोजल हेतु इनसिनेटरी मशीनें होंगी. इसके अलावा वारी में मोबाइल फिल्म फेस्टिवल भी आयोजित किया जाएगा. जिसमें महिला सक्षमीकरण का संदेश देनेवाली फिल्में दिखायी जाएंगी. महिला कीर्तनकार और भारूडकारों के कार्यक्रम भी आयोजित किए जाएंगे. दिंडी में रोज एक क्षेत्र की महिला हस्तियां शामिल होंगी.*

शनिवारवाड़ा में संपन्न हुये इस कार्यक्रम में विजया रहाटकर ने कहा, 'महिला संबंधी कई कानून और योजनाएं हैं. जिनकी महिलाओं को जानकारी नहीं होती. 'वारी-नारी शक्ति' चित्ररथ के जरिए महिलाओं तक यह जानकारी पहुंचाने का काम किया जाएगा. इन योजनाओं का लाभ लेकर महिलाएं निश्चित रूप से आत्मनिर्भर बनेंगी. महिला सक्षमीकरण का यह उद्देश्य लेकर ही हम वारी में शामिल हुए हैं.

डॉ. सदानंद मोरे ने कहा कि महिला आयोग ने महाराष्ट्र की महत्वपूर्ण परंपरा के साथ खुद को जोड़ लिया है. इसके लिए मैं उनको धन्यवाद देता हूं. महापौर मुक्ता तिलक ने इस अनोखी वारी के लिए शुभकामनाएं दीं. शनिवारवाड़ा में चित्ररथ का लोकार्पण करने के बाद भिड़ेवाड़ा, जहां साध्वी सावित्रीबाई ने लड़कियों का पहला स्कूल शुरू किया, तक यह दिंडी निकाली गई. इस अवसर बड़ी संख्या में महिलाएं उपस्थित थीं.

Prabhat - Pune edition 28/6/2019

# 'वारी नारीशक्तीची' मार्गस्थ

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २७-** 'महिलांविषयीच्या प्रबोधनाचे काम हे केवळ महिला आयोगाचे नसून ते प्रत्येक नागरिकाचे आहे आणि प्रत्येकाने ते केले पाहिजे. हीच जागरूकता आणण्यासाठी महिला आयोगातर्फे आयोजित 'वारी नारीशक्तीची' हा उपक्रम उपयुक्त ठरेल. पुणे शहराची प्रबोधनाची परंपरा लक्षात घेता महिला आयोगाने दिंडीची सुरुवात पुण्यात करून एक चांगला पायंडा पाडला आहे,' असे मत विधानसभेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गुरूवारी व्यक्त केले.



राज्य महिला आयोगातर्फे वारीमध्ये महिलांचा लक्षणीय सहभाग लक्षात घेत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन डॉ. गोऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापौर मुक्ता टिळक, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, मंजुषा मोळवणे, वृंदा कीर्तीकर, भाजपचे शहराध्यक्ष योगेश गोगावले, राधाबाई सोकासे उपस्थित होते. शनिवारवाड्यामध्ये चित्ररथाचे लोकार्पण झाल्यानंतर तेथून भिडेवाड्यापर्यंत (जिथे क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले यांनी मुलींची देशातील पहिली शाळा सुरू केली) दिंडी काढण्यात आली.

> “ महिलांसंबंधी अनेक कायदे आणि योजना आहेत ज्यांची माहिती सहसा महिलांचं नसते, या योजना महिलांपर्यंत पोहोचवण्याचे काम आम्ही या उपक्रमाअंतर्गत करणार आहोत. महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट समोर ठेऊन आम्ही वारीमध्ये सहभागी झालो आहोत.
>
> – **विजया रहाटकर,** अध्यक्ष, राज्य महिला आयोग.

Indian Express Pune edition 28/6/2019

# Aimed at women empowerment, Wari Nari Shakti initiative launched

**SNEHA KUDVA**
PUNE, JUNE 27



Pune Mayor Mukta Tilak was part of the procession, which included a Chitra Rath to create awareness about laws for women. *Express*

The 'Wari Nari Shakti' initiative was inaugurated during the *palkhi* procession at Shaniwar Wada on Thursday. On the occasion, Vijaya Rahatkar, chairman, Maharashtra State Commission for Women, Pune, said: "Women are the backbone of the family... Men and women are equal; women are walking shoulder to shoulder with their brothers in this pilgrimage."

The procession included a Chitra Rath (floating vehicle) to create awareness about laws for women, health and hygiene of women. The programme also showcased a special Dindi on women empowerment from Shaniwar Wada to Bhide Wada.

"I wish for this women empowerment initiative to go beyond this pilgrimage and that one day, we will see the rise of women in every field, including politics," said Neelam Gorhe, deputy chairman of the Maharashtra Legislative Council. She added, "At a time when politicians, orators, and journalists are trying their best to bring out these burning issues, we as a society must come together to help put an end to these issues."

"Our aim is to make this pilgrimage a safe space for women to learn and grow as individuals. We wish to raise more awareness of the concepts of women's health and hygiene through our efforts" said Mukta Tilak, mayor of Pune.

Sadanand More, an eminent writer, said, "We are all equal in god's eyes, and it is our duty to make sure that there is no discrimination." The initiative aims at providing sanitary vending machines and incinerator machines on both the routes of the pilgrimage and will showcase movies based on women empowerment. The movies include, *Dangal*, *Damini*, *Toilet Ek Prem Katha* and select short films.

Loksatta Pune edition 28/6/2019

# महिलांविषयक प्रबोधनात पुरुषांचा सहभाग हवा - डॉ. नीलम गोऱ्हे

**प्रतिनिधी, पुणे**

**पुणे शहराची** प्रबोधनाची परंपरा लक्षात घेता महिला आयोगाने 'वारी नारीशक्तीची' या दिंडीची सुरुवात पुण्यात करून एक चांगला पायंडा पाडला आहे. महिलांविषयीच्या प्रबोधनाचे काम हे केवळ महिला आयोगाचे नसून ते प्रत्येक नागरिकाचे आहे. ऑनर किलिंग, जातपंचायतीचे बहिष्कार, लहान मुलींवर होणारे अत्याचार या घटना बघता महिलांसंबंधी प्रबोधनाच्या कार्यात महिला आणि पुरुष या दोघांचाही सहभाग आवश्यक आहे, असे मत विधानसभेच्या नवनिर्वाचित उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गुरुवारी व्यक्त केले.

वारीतील महिलांचा लक्षणीय सहभाग विचारात घेता राज्य महिला आयोगाने 'वारी नारीशक्तीची' या उपक्रमाद्वारे पंढरपूरच्या वारीत सहभाग घेतला आहे. या निमित्ताने



'वारी नारीशक्तीची' या राज्य महिला आयोगाच्या दिंडीचा प्रारंभ गुरुवारी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर आणि महापौर मुक्ता टिळक यांच्या उपस्थितीत झाला.

तयार केलेल्या चित्ररथाचा प्रारंभ गुरुवारी करण्यात आला.

या वेळी महापौर मुक्ता टिळक, संत साहित्याचे अभ्यासक, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर उपस्थित होत्या.

विजया रहाटकर म्हणाल्या, महिलांसंबंधी अनेक कायदे आणि योजना आहेत, मात्र महिलांनाच त्यांची माहिती नसते.

या योजना महिलांपर्यंत पोहोचवण्याचे काम या उपक्रमांतर्गत करणार आहोत. या योजनांचा लाभ घेऊन कुटुंबाचा कणा असलेली महिला आत्मनिर्भर आणि सबळ होऊ शकेल. तिचे समाजातील स्थान उंचावेल.

डॉ. सदानंद मोरे यांनी राज्य महिला आयोगाच्या उपक्रमाचे कौतुक केले आणि उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्राची परंपरा आणि ओळख असलेल्या पंढरपूरच्या वारीशी आणि वारकरी परंपरेशी सर्व स्तरांतील व्यक्ती आणि संस्थांनी स्वतःला जोडून घेतले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महापौर मुक्ता टिळक यांनीही 'वारी नारीशक्तीची' या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमानिमित्त अहमदनगर येथील स्नेहाधार संस्थेचे लाभार्थी आणि कर्मचारी असे पन्नास सदस्य उपस्थित होते. महिला सक्षमीकरणासाठी महिला आयोग आणि 'स्नेहालय' यांच्यातर्फे 'सक्षमा' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

Lokmat 28/6/2019





# वारी हे प्रबोधनाचे पहिले पाऊल : डॉ. नीलम गोऱ्हे

### वारी नारी शक्तीची वैशिष्ट्ये